<u>**अतारांकित प्रश्नोत्तरांची तिसरी यादी**</u>

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पोलिसांची घरे बांधताना ब्रँडेड कंपनीच्या सुविधा पुरविण्याबाबत**

**(१) ४५६२ (१०-०४-२०१५). श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तब्बल साडेपाच हजार हेक्टर भूखंडाचे मालक असलेल्या पोलीसांसाठी घरे बांधताना आतापर्यंत कुठल्याही प्रकारची काळजी घेतली नसल्याने अल्पावधीत या इमारती निवासी योग्य नसल्याचे स्पष्ट झाल्याचे पोलीस गृहनिर्माण मंडळाचे महासंचालक यांनी शासनास कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) पोलीसांची घरे बांधताना कंत्राटदारांनी घरांची निर्मिती करुन आवश्यक त्या ब्रँडेड कंपनीच्या सुविधा पुरवाव्या याविषयीची एक सविस्तर नियमावली महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण मंडळाने तयार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नियमावलीचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१६) :** (१) राज्यातील बहुतांशी ठिकाणी पोलीसांची निवासस्थाने जुनी असल्यामुळे निवासस्थाने जीर्ण व नादुरुस्त असल्याचे महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाने कळविलेले आहे.

(२) होय.

(३) सदरील नियमावलीत पुढील बाबींचा समावेश केलेला आहे :-

१) सिमेंट-ultra tech/ACC/Birla Plus/Birla Gold/Vasavdalla/ Ambuja.

२) लोखंड (Steel)- Tiscon / Vizac/ Jindal/ sail/ Tata.

३) बांधकामाच्या विटा (bricks)- Siporex/ Ultra tech/ Magicrete Ecolite.

४) दरवाजे (Door).

i) water proof doors Anchor Century/ Green

ii) FRP- House of Door/Perma Funish Syntex/ Everest

iii) दरवाजाच्या जोडणीच्या वस्तू (door fixtures & fastening) shalimar / Vinus

५) स्नानगृह/शौचालयामधील भांडी (Sanitory fiting) Hindware/ Cera /Jaquar/Jonson/ Perryware

६) लादी (Flooring Tiles) Kajaria/Jonson / Nitco/Rak.

७) रंग (Paint) Asian/Neorlac/Burger/ Dulux. Polymer Based external Paint-Apex from Asian Paints/Excel from Berolax shalimar/ Berger.

८) CPVC वाहिनी - Finolex /Suprim/ Jain/ Ashtral.

९) मोटार पंप -Kirloskar Crompton.

१०) नळ जोडणीच्या वस्तू (Plumbing fitting) Jaquar/ Johnson/ Ess-Ess.

११) विद्युत वस्तू (Electrical fitting)-

i) indoor electrical fitting-Philips/Wipro/Havells/Bajaj/Anchor/Crompton/L&T.

ii) indoor Wiring &a Casing -Finolex polycab/Anchor/L&T.

---

## मुंबईत एसआरए योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२) ४७४१ (१०-०४-२०१५). श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत एसआरए मुदतीत पूर्ण न करणा-या विकासकाकडून न झालेली दंड वसूली तसेच स्मार्ट कार्ड वाटपाच्या विलंबाबाबत कंत्राटदाराकडून दंड वसुली न झाल्याने एसआरएचे नुकसान झाल्याचे तसेच मुदत ठेवीच्या रक्कमांमध्ये १० कोटीचा गैरव्यवहार झाल्याचा आक्षेप लेखा परिक्षणात करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार एसआरएमध्ये गैरव्यवहार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता (०५-०३-२०१६) :** (१), (२) व (३) होय.

झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण न करणाऱ्या विकासकांकडून दंड वसूल करण्याची तरतूद नियमावलीमध्ये नाही. सदरची वस्तूस्थिती मा.लोकलेखा समितीसमोर सादर करण्यात आली आहे.

सन २०१२-१३ मध्ये महालेखापाल यांच्या लेखा परिक्षा पथकाने उपस्थित केलेल्या परिच्छेद-७ नुसार मे.स्मार्टकार्ड आयटी सोल्युशन लिमिटेड यांचेकडून करारनाम्यातील पॅनल्टी क्लॉज क्र.४ व ५ मधील दंडात्मक तरतुदीनुसार विलंबाबाबत रु.५,९८,७९९/- इतकी दंडाची रक्कम वसुल करण्यात आली आहे.

मुदत ठेवीच्या रु.१० कोटी इतक्या रक्कमेच्या आक्षेपाबाबत सदर रक्कम परत मिळविण्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालय येथे स्टेट बँक ऑफ इंडिया, वागळे इस्टेट शाखा यांच्याविरुध्द समरी सूट दाखल करण्यात आला असून मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बँकेने समरी सूटच्या नावे रु.१० कोटी रक्कमेची मुदत ठेव केली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निकालानंतर सदरची रक्कम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे घेण्याबाबत निर्णय होणार आहे. या प्रकरणी तत्कालीन लेखाधिकारी व उपलेखापाल यांना निलंबित करण्यात आले असून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाथरी (जि.परभणी) येथील श्री.साईबाबा यांच्या जन्म भूमीचा आराखडा तयार करण्याबाबत**

**(३) ५४७१ (०८-०४-२०१५). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देश विदेशातील भाविकांचे श्रद्धास्थान असणा-या पाथरी (जि.परभणी) येथील श्री.साईबाबा यांच्या जन्मभूमीच्या आराखडा तयार करण्याबाबत तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांना सन २०१४ मध्ये आदेशीत केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, परभणी यांनी सदर आराखडा शासनाकडे सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सादर केलेल्या आराखडयास शासनाने मंजुरी दिली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०१६) :** (१) नाही.

तथापि, श्री.दुर्राणी अब्दुल्लाखान लतीफखान ऊर्फ बाबाजानी, विधानपरिषद सदस्य यांनी तत्कालीन मुख्यमंत्री महोदय यांना याबाबत विनंती केली होती.

(२) व (३) नाही.

जिल्हाधिकारी, परभणी यांनी श्री.साईबाबा यांच्या जन्मभूमीचा आराखडा सादर करण्याबाबत मुख्याधिकारी, पाथरी नगरपरिषद यांना सूचित केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शेततळयांची व गतिमान पाणलोट क्षेत्राची कामे निकृष्ट दर्जाची केल्याबाबत

**(४) ५८९१ (१६-०४-२०१५). श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१२ ते २०१४ या कालावधीत गंगाखेड, जितुर, सेलू आणि मानवत (जि.परभणी) तालुक्यात कृषी खात्यात तेथील तालुका कृषी अधिकारी यांनी ठेकेदार व शेतकरी यांना हाताशी धरुन नालाबडीग, शेततळयांची व गतिमान पाणलोट क्षेत्राची कामे ही अत्यंत निकृष्ट दर्जाची करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने तातडीने चौकशी करुन दोषी अधिकारी, ठेकेदार यांच्यावर तातडीने कारवाई करावी म्हणून तेथील नागरिकांनी सन २०१४ मध्ये व त्या सुमारास मा.वि.कृ.स.स. लातूर आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, परभणी यांच्याकडे तक्रारी दाखल केलेल्या आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात त्यांना काय आढळून आले, सदर प्रकरणात कोणकोणत्या अधिकाऱ्यांचा समावेश असून त्यांनी किती रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे आढळून आले आहे,

(४) सदर प्रकरणात दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

सदर कालावधीत पाणलोट व जलसंधारणाची कामे कोणतेही ठेकेदार अथवा शेतकरी यांच्या मार्फत केलेली नाही. तथापि, सन २०१३-१४ मध्ये नोंदणीकृत मशिनधारकांकडून कामे करून घेण्यात आलेली आहेत. सदरहू कामाची मोजमापन पुस्तिकेमध्ये नोंद करण्यात आले असून मशिनधारकांना आरटीजीएस/धनादेशाद्वारे रक्कम अदा केलेली आहे.

(२) हे खरे नाही.

सदरहू प्रकरणाशी संबंधीत कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जलसंपदा विभाग, सोलापूर येथे कार्यकारी अभियंता यांनी केलेला गैरव्यवहार

**(५) ५९०१ (०९-०४-२०१५). श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.एन.आर.कारीमुंगी, कार्यकारी अभियंता स्थानिक स्तर जलसंपदा विभाग, सोलापूर यांनी सन २०१३-२०१४ मध्ये शासनाने दिलेल्या ५० कोटीचा संपुर्ण निधी हा मजुर संस्थांना आर्थिक गैरव्यवहार करुन दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या निधीतून सुशिक्षित बेरोजगारांना ३३ टक्के कामे देण्याचा शासनाचा निर्णय असताना श्री.कारीमुंगी यांनी सदरच्या संघटनेला न विचारात संपूर्ण निधी वाटप केलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर येथील सुशिक्षित बेरोजगार संघटनेने आपल्या विविध मागण्यांचे निवेदन राज्याचे माजी मुख्यमंत्री, माजी जलसंपदा मंत्री, मुख्य अभियंता जलसंधारण विभागास दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४, १ मार्च, २०१४ आणि ५ मार्च, २०१४ रोजी दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्या संघटनेने आपल्या विविध मागण्यासाठी व श्री.एन.आर. कारीमुंगी यांच्यावर कारवाई करण्यासाठी दिनांक १३ मार्च, २०१४ रोजी सोलापूर येथे कुमठा नाका येथील पाटबंधारे कार्यालयासमोर उपोषण केलेले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात त्यांना काय आढळून आले, त्यानुसार शासनाने संबंधित दोषी असणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०२-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

मंजूर कामांची निविदा प्रक्रिया करताना सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्र.सीएटी ०७/०६/प्र.क्र.९४/इमा २, दि.१६.११.२००६ मध्ये मंजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांच्यामध्ये ३३:३३:३४ अशा सुत्राने वाटप करण्याचे आदेश आहेत. त्यानुसार निविदांबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय मातंस/नस्ती-२०१२/प्र.क्र.२७३/३९, दि.१९/०१/२०१३ नुसार रु.१० लक्ष किंमतीवरील सर्व निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागविण्याचे आदेश आहेत.

त्याप्रमाणे एकूण ७९७ निविदांपैकी २२० (२८%) कामे केवळ सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना वाटप करण्यात आली आहेत. कामाच्या वाटपाच्या प्रमाणात अल्प बदल झालेला आहे. तथापि सर्व निविदा प्रक्रिया ई-निविदा प्रणालीद्वारे व पारदर्शकपणे राबविण्यात आली असल्याने त्याबाबत सुशिक्षित बेरोजगार अभियंता संघटनेला विचारात घेणेबाबत प्रश्न उद्भवत नाही.

(३) होय.

महाराष्ट्र राज्य सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता संघटनेने दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ व सोलापूर येथील सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य असोशिएशनचे दिनांक १ मार्च, २०१४ रोजी दिलेली निवेदने प्राप्त झाली आहेत. दि. ५ मार्च, २०१५ रोजीचे निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४) हे खरे नाही.

संबंधित विभागाकडून प्राप्त अहवालनुसार दि.१३ मार्च, २०१४ रोजी सुशिक्षित बेरोजगार अभियंता संघटनेकडून उपोषण करणेसाठी संघटनेचे काही अभियंते त्या दिवशी जमा झाले

होते. परंतु प्रत्यक्षात उपोषणास बसले नाहीत.
(५) संघटनांनी दिलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशीची कार्यवाही प्रगतीत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील मिरारोड येथील नयानगर येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन उभारण्याबाबत**

**(६) ६९८९ (०६-०८-२०१५). श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** तारांकित प्रश्न क्रमांक ३०११ ला दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरारोड (जि.ठाणे) येथील नयानगर येथे (आरक्षण क्रमांक १८४ अ भूखंड) स्वतंत्र पोलीस स्टेशन उभारण्यासाठी दिनांक १४ मार्च, २०१४ रोजी मंजूरी मिळाली असूनही अद्याप पोलीस स्टेशनसाठी जागा उपलब्ध झाली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे खरे काय,
(२) असल्यास, नयानगर पोलीस स्टेशनसाठी जागा उपलब्ध करण्यासाठी तसेच सदरील जागा ताब्यात घेण्याची जबाबदारी कोणाची राहील, याबाबत शासन खुलासा करील काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) :** (१) होय.
(२) नयानगर पोलीस स्टेशनसाठी आरक्षण क्र.१८४ अ अंतर्गत आरक्षित जमिनीवरील ७/१२ खाजगी व्यक्तीच्या नावे असल्याने, सदर जागेचे भूसंपादनासाठी महानगरपालिकेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे आणि मुलुंड दरम्यान प्रस्तावित रेल्वे स्टेशनासाठी जागा मिळण्याबाबत**

**(७) ७५४७ (०६-०८-२०१५). ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे आणि मुलुंड स्टेशन दरम्यानचा प्रस्तावित विस्तारीत ठाणे स्टेशनसाठी ठाणे मनोरुग्णालयाच्या ताब्यातील ३१ हेक्टरपैकी ६ हेक्टर जागा लागणार असल्याचा प्राथमिक अहवाल ठाणे महानगर पालिकेने नेमलेल्या सल्लागाराने दिला असल्याचे दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) तसेच त्याबाबतचा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेकडून सार्वजनिक आरोग्य विभागाकडे सादर करण्यात आला, त्याप्रकरणी सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास घोषित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव सादर केला असल्यास ठाणे मनोरुग्णालयाच्या ताब्यातील जमीन विस्तारित ठाणे रेल्वे स्टेशनकरिता मिळविण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे तसा प्रस्ताव सादर केला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी मा.मंत्री, सा.बां. (सा.उ.) व मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य यांचे दरम्यान दिनांक १५.१२.२०१४ रोजी झालेल्या बैठकी दरम्यान मध्य रेल्वे मार्फत मंजुरीप्राप्त अभियांत्रिकी नकाशा नुसार या प्रकरणी सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आल्यानंतर उचित निर्णय घेण्यात येईल असे मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य यांनी सांगितले असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) मा.मुख्यमंत्री महोदयांकडे अशी लेखी मागणी केल्याचे निदर्शनास येत नाही.
(४) सद्यस्थितीत ठाणे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित विस्तारीत ठाणे स्थानकासाठीचे चार पर्यायी अभियांत्रिकी नकाशे मध्य रेलवेकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सदरच्या पर्यायी नकाशांपैकी ज्या अभियांत्रिकी नकाशास मध्य रेल्वेची प्राथमिक मंजुरी प्राप्त होईल त्यानुसार ठाणे मनोरुग्णालयाच्या ताब्यातील जमीन मिळविण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

---

## मुंबई महापालिकेच्या नागरी समस्या सोडविणेबाबत

**(८) ७७८७ (०६-०८-२०१५). श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेला सन २०१४ मध्ये आलेल्या ६६ हजार ७४७ समस्यांपैकी केवळ ३५ टक्के समस्या सोडविल्याचे निष्कर्ष प्रज्ञा फांऊडेशन या संस्थेने केलेल्या पाहणी अहवालातून काढला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरवर्षीप्रमाणे प्रज्ञा या संस्थेच्या पालिकेच्या १७ प्रभाग समित्यांवरील कामकाजाचा आढावा घेऊन अहवाल प्रकाशित केला आहे यामध्ये नागरी समस्याऐवजी रस्ते व चौकांच्या नामकरणाचे सर्वाधिक प्रश्न विचारले जात असल्याचे व प्रभाग समित्यांच्या बैठकामधील नगरसेविकांची हजेरी आठ टक्क्यांनी तर प्रश्न विचारण्याचे प्रमाण दोन टक्क्यांनी घटले असल्याने नागिरकांच्या समस्या सोडविण्यात दिरंगाई होत आहे व शहराचा दर्जा यामुळे

टिकविण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे, याबाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व नागरी समस्या सोडविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) नागरी समस्या सोडविण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी कार्यवाही केली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर जिल्ह्यातील घरकुले बांधून लाभार्थ्यांना देण्याबाबत

**(९) ७९२६ (०६-०८-२०१५). श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) सोलापूर जिल्ह्यात सुमारे ३० हजार कुटुंबे घराच्या प्रतिक्षेत असताना तुटपुंज्या निधीमुळे घरे पूर्ण झाली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार जिल्ह्यातील घरकुले बांधून लाभार्थ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०१-२०१६) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उमरी (जि.नागपूर) येथे विहिरीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१०) ८२२२ (०३-०८-२०१५). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरी (जि.नागपूर) येथील श्री.नरेंद्र बागडे या अनुसूचित जातीतील शेतक-याने सन १९९४ पासून पूर्ण अनुदानात मिळणारी विहिर आपल्या शेतात मिळावी यासाठी संबंधित गटविकास अधिका-यांकडे केलेल्या मागणीनुसार विहिरीचे बांधकाम केले असले तरी संबंधित अधिका-यांनी

श्री.बागडे यांना देय असलेली रक्कम न देता ती रक्कम कंत्राटदाराला देण्यांत आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, सदर विहिरीच्या गैरव्यवहाराबाबत संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०१-२०१६) :** (१) नाही, पंचायत समिती सावनेर, अंतर्गत मंजूर केलेल्या सिंचन विहीर लाभार्थ्यांच्या यादीमध्ये श्री.नरेंद्र बागडे यांचे नाव आढळून आले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरात अत्याधुनिक कत्तलखाने उभारण्याबाबत**

**(११) ८२६० (०६-०८-२०१५). श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात अधिकृत बोकड कत्तलखाने किती आहेत,

(२) नागपूर शहरात अवैध बोकड कत्तलखाने किती आहेत,

(३) कत्तलखान्यांना परवानगी देण्याचा व तपासण्याचा अधिकार मनपाला वा एफडीए विभागाला आहे, हे खरे आहे काय,

(४) शहरातील अवैध कत्तलखान्यांना शासन परवाना देणार आहे काय,

(५) नागपूर शहरात ताजे, स्वच्छ दर्जेदार व चांगले मांस जनतेला मिळावे याकरिता शासन अत्याधुनिक कत्तलखाने तयार व्हावेत याकरिता काही उपाययोजना करणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१६) :** (१) अधिकृत दोन कत्तलखाने आहेत.

(२) अनधिकृत कत्तलखाने नाहीत.

(३) कत्तलखान्यांना परवानगी देण्याचा अधिकार एफडीए विभागाला असून त्याकरिता स्थानिक संस्थेचे ना हरकत आवश्यक आहे.

(४) अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ चे कलम ३१ अन्वये अन्न व्यावसायिक विनापरवाना अथवा विनानोंदणी व्यवसाय करुन शकत नाहीत.

(५) अत्याधुनिक कत्तलखाना तयार करण्याकरिता महानगरपालिकेद्वारे EOI द्वारे प्रस्ताव मागवून मे.अलकुरेश मल्टीपरपझ असोसिएशन, नागपूर या संस्थेस नियुक्त करण्यात आलेले असून, त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. तसेच कत्तलखान्यामध्ये येणाऱ्या जनावरांची कत्तलीपूर्वी

आरोग्य तपासणी करण्यात येत असून, त्याकरीता पशुवैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. तसेच कत्तलखान्यामध्ये स्वच्छतेच्या दृष्टीने सुध्दा योग्य उपाययोजना करण्यात येत असून, नागपूर शहरात ताजे, स्वच्छ, दर्जेदार व चांगले मांस जनतेला मिळावे याकरिता महापालिका प्रयत्नशील आहे.

---

**तालुका व जिल्हा रुग्णालयामध्ये रेबीज इंजेक्शनचा पुरवठा व आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१२) ८४१३ (३१-०७-२०१७). श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक ५६२९ ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये कुत्रा चावल्यानंतर रेबीज इंजेक्शनचा पुरवठा वेळेत होत नसल्याने राज्यात अनेकजण प्राणास मुकत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेबीजचे इंजेक्शन तालुका व जिल्हा रुग्णालयामध्ये होण्याकरीता आवश्यक सुविधा उपलब्ध करण्याचा विचार राज्य शासन करत आहे, हे खरे आहे काय,

(३) याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०३-२०१६) :** (१) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या तसचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारित असलेल्या रुग्णालयांमध्ये श्वानदंश लसीचा (Anti Rabies Vaccines) पुरेसा साठा उपलब्ध आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात कर्करोगाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याबाबत**

**(१३) ८५३९ (३१-०७-२०१५). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कर्करोगाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून गेल्या तीन वर्षात सुमारे ९० हजार ५९५ कर्करुग्णांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतून उपचार देण्यात आलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कर्करोग रुग्णांची वाढणारी संख्या विचारात घेता त्यांना उपचारासाठी अधिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) तसेच कर्करोग रुग्णांची वाढती संख्या व त्यात होणारे मृत्यू टाळण्यासाठी उपचार पध्दतीत नविन तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**डॉ. दीपक सावंत (१२-०२-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे. मागील तीन वर्षात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतंर्गत राज्यातील ६४,९१४ लाभार्थ्यांनी लाभ घेतला असून राज्यात एकूण १६४,६६४ कर्करुग्णांवर शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले आहेत.

(२) राज्यात सर्व जिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालये येथे कर्करोगांची प्राथमिक तपासणी करण्यात येते. निश्चित निदान आणि औषधोपचाराकरिता वैद्यकीय महाविद्यालय, सुपर स्पेशालिटी रुग्णालय व पात्र रुग्णांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत तेथे संदर्भित केले जाते. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत कर्करोगावरील वैद्यकीय उपचारासाठी ३७१, कर्करोगावरील शस्त्रक्रियेसाठी २२१ व कर्करोगावरील क्ष-किरणाद्वारे उपचारांसाठी ४८ विशेषज्ञ सेवा असणारी रुग्णालये अंगीकृत करण्यात आली आहेत.

(३) कर्करोगाची प्राथमिक अवस्थेत निदान करण्यासाठी जनजागृती केली जाते तसेच कर्करोग निदान शिबीरे आयोजित करण्यात येतात. संशयित कर्करोग ग्रस्त रुग्णांना निश्चित निदान व उपचारासाठी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना अंतर्गत अंगीकृत रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालये व सुपर स्पेशालिटी रुग्णालयात संदर्भित करून योग्य उपचार करण्यात येतात.

---

**राज्यात आरोग्य केंद्र, उपकेंद्राचा व ग्रामीण रुग्णालयाचा अनुशेष भरण्याबाबत**

**(१४) ८६६९ (३१-०७-२०१५). श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.शरद रणपिसे, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण लोकसंख्येनुसार राज्यात सुमारे २९३२ आरोग्य उपकेंद्रे, ३९० प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि १९० ग्रामीण रुग्णालयांची कमतरता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सेवा मिळण्यास खूप अडचण निर्माण झाली असून आरोग्य सेवे अभावी ग्रामीण जनतेचे गैरसोय व हाल होतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात पुरेशी आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालये कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही. शासन निर्णय दिनांक १७.१.२०१३ व दिनांक ९.६.२०१४ अन्वये राज्यामध्ये एकूण १३६८ आरोग्य संस्था मंजूर करण्यात आलेल्या आहेत. या आरोग्य संस्था ५ वर्षात टप्याटप्याने कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) सदर आरोग्य संस्था कार्यान्वित करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील किनवट प्रकल्पातील पाण्याचे व्यवस्थापनाबाबत**

**(१५) ८९४२ (०३-०८-२०१५). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील किनवट प्रकल्पातील पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी किनवट येथे कार्यान्वित असलेल्या पाचही पाटबंधारे उपविभागातील कार्यालयाचा कारभार विस्कळीत असून अधिकारी/कर्मचारी जिल्ह्याच्या ठिकाणी राहूनच कर्तव्य बजावत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मुख्यालयी न राहणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करुन त्याच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद अंतर्गत नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण) व लघु पाटबंधारे विभाग, नांदेड अंतर्गत ३ उपविभागीय कार्यालये किनवट मुख्यालयी कार्यरत आहेत. सदर उपविभागीय कार्यालयात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांचे नाव व त्यांचा मुख्यालयातील निवास पत्ता खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | घरचा पत्ता |
|---|---|---|---|
| नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण), नांदेड अंतर्गत पाटबंधारे उपविभाग, किनवट | | | |
| (१) | श्री.महंमद शहानावज खॉन | शाखा अभियंता | एफ.एच.पठाण यांचा वाडा, गोकूंदा |
| (२) | श्री.व्ही.आर.वाघमारे | सहा.अभियंता श्रेणी-२ | राजू नाकीवार यांचा वाडा गोकूंदा |
| (३) | श्री.वाय.पी.बावस्कर | सहा.अभियंता श्रेणी-२ | साळवे गुरुजी यांचे घर बोधडी |
| (४) | श्री.व्ही.पी.शिंदे | वरिष्ठ लिपिक | उत्तम जाधव यांचे घर गोकूंदा किनवट |
| लघु पाटबंधारे उपविभाग किनवट | | | |
| (१) | श्री.आर.एस.तिवारी | उप विभा.अधि. | श्री.ताटावार यांचा वाडा राजेंद्र नगर किनवट |
| (२) | श्री.बी.पी.फुलारी | शाखा अभियंता | राजू नारलावार यांचे घर गोंकूदा |
| (३) | श्री.बी.जी.खरात | शाखा अभियंता | राजू नारलावार यांचे घर गोंकूदा |
| (४) | श्री.एस.बी.कोचत | वरिष्ठ लिपीक | द्वारा एस.एन.चन्नमनवार घर नं.७१७ एसव्हीएम कॉलनी बाजाजी मंदिरा जवळ किनवट |

| मध्यम प्रकल्प उप विभाग क्र.२ किनवट | | | |
|---|---|---|---|
| (१) | श्री.बी.एस.शिरसीकर | शाखा अभियंता | राजू नारलावार यांचे घर गोंकूदा |
| (२) | श्री.आर.एम.नेमानीवार | शाखा अभियंता | स्वत:चे घर शिवम कॉलनी |
| (३) | श्री.एस.ए.गुडसूरकर | वरिष्ठ लिपीक | एस.एम.वाघमारे यांचे घरी गोंकूदा |

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**करखेली (ता.धर्मापूर, जि.नांदेड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी रुग्णालयात राहत नसल्याने रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(१६) ८९४४ (३१-०७-२०१५). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करखेली (ता.धर्मापूर, जि.नांदेड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सोईसुविधा तसेच वैद्यकीय अधिकारी रुग्णालयात राहत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील प्रकरणी चौकशी करुन शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांसाठी विविध सोईसुविधा पुरविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२४-०२-२०१६)** :(१) हे खरे आहे.

करखेली ता.धर्माबाद, जि.नांदेड येथील प्रा.आ.केंद्रात वैद्यकीय अधिकारी कर्तव्यावर नेहमी गैरहजर राहून कसून करत असल्याबाबतची तक्रार माहे एप्रिल, २०१५ मध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी, नांदेड कार्यालयास प्राप्त झाली आहे.

(२) सदरील तक्रारीच्या अनुषंगाने अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे मार्फत चौकशी करण्यात आली आहे. त्या चौकशी अहवालानुसार प्रा.आ.केंद्र, करखेली, ता.धर्माबाद येथील द्वितीय वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी वास्तव्य करुन रहात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविण्यात आलेला आहे व संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(३) तालुका आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत प्रा.आ.केंद्राचे कामकाज सुरळीत चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यभरातील धरणग्रस्तांच्या मागण्यांबाबत**

**(१७) ९१३० (३१-०७-२०१५). श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील धरणग्रस्तांनी दिनांक ५ मे, २०१५ रोजी लॉंग मार्चने पायी पाटणला जावून आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंदोलन कर्त्यांच्या मागण्या कोणकोणत्या आहेत,

(३) तसेच सदर मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) :** (१), (२) व (३) होय. श्रमिक मुक्ती दल यांचेतर्फे दि.२६.३.२०१५ रोजी जिल्हाधिकारी, सातारा यांना नवीन भूसंपादन कायद्यात केंद्र शासनाने केलेले अन्यायकारक बदल तातडीने मागे घ्यावेत व अन्य तीन मागण्यांबाबत निवेदन दिलेले आहे. सदर मागण्यांच्या अनुषंगाने दिनांक १२ मे, २०१५ रोजी माझ्या अध्यक्षतेखाली श्रमिक मुक्ती दल यांचे समवेत बैठक घेण्यात आली असून, उचित कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कामगार रुग्णालयातील कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित असल्याबाबत**

**(१८) ९७०१ (०३-०८-२०१५). श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राज्य कामगार विमा योजनेंतर्गत रुग्णालयातील कर्मचारी मागील ४ वर्षापासून पदोन्नतीपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी दिनांक २५ मे, २०११ रोजी पदोन्नतीचा अध्यादेश जारी केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार पदोन्नतीची प्रकरणे प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०३-२०१५) :** (१) नाही. कार्यालयीन अधीक्षक, वरिष्ठ सहायक, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक, क्ष-किरण सहायक, प्रयोगशाळा सहायक या संवर्गामध्ये पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात पश्चिम विदर्भातील सिंचन प्रकल्पातील जलसाठा उन्हाळयात क्षमतेपेक्षा कमी झाल्याबाबत**

**(१९) ९७६६ (०३-०८-२०१५). श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पश्चिम विदर्भातील ४ मोठे व १६ मध्यम प्रकल्पासह ३०० वर सिंचन प्रकल्पातील जलसाठा उन्हाळयात क्षमतेपेक्षा कमी झाल्याची बाब दिनांक ८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात पाणी टंचाई जाणवत असून सिंचनाचा साठा व पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०२-२०१६) :** (१) नाही.

पश्चिम विदर्भात ९ मोठे, २३ मध्यम व ४१७ लघु असे एकूण ४४९ प्रकल्प आहेत. या प्रकल्पांचा एकूण संकल्पीत उपयुक्त पाणी साठी २९१७.३१ दलघमी असून दिनांक ८.५.२०१५ रोजी वरील प्रकल्पांमध्ये एकूण ७८०.७२ दलघमी (२६.७६%) उपयुक्त पाणी साठा उपलब्ध होता.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक विभागातील गायरान/गुरेचरण अथवा गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरातील जमिनीवरील अतिक्रमणे तथा अनधिकृत बांधकामे निश्चित करुन मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार कारवाई करण्याबाबत**

**(२०) ९८७४ (३०-०७-१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गायरान/गुरेचरण अथवा गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरातील जमीन कोणतीही व्यक्ती खाजगी संस्था, संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजूर करण्यात येवू नये, असे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ जानेवारी, २०११ रोजी आदेश दिलेले असून त्यानुषंगाने महसूल व वन विभागाने दिनांक १२ जुलै, २०११ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने उक्त जमिनीवरील अन्य प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे तथा अनधिकृत बांधकामे फार जुनी असली व बांधकामावर फार खर्च केला असला तरी ती तात्काळ निष्कासित करण्याची कार्यवाही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांनी विशेष कृती कार्यक्रम तयार करुन करावी, असे विहित करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक विभागात अशा पध्दतीने किती गायरान/गुरेचरण व सार्वजनिक वापरातील जमिनींवर अतिक्रमण तथा अनधिकृत बांधकाम झाल्याचे निष्पन्न झालेले आहे व त्याविरुध्द स्थानिक स्वराज्य संस्थांकडून किती प्रकरणी कारवाई करण्यात आलेली आहे,
(४) अद्याप अतिक्रमणे वा अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आलेले नसल्यास मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश होवून तीन वर्षाचा कालावधी उलटूनही कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत व मा.न्यायालयाच्या या अवमाननेस कोण जबाबदार आहेत व त्यांचेविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री.एकनाथराव खडसे (९-०२-२०१६) :** (१), (२), (३) व (४) गायरान/गुरेचरण अथवा गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरातील जमीन कोणत्याही व्यक्ती, खाजगीसंस्था किंवा संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजूर करण्यात येवू नये याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे महसूल व वन विभागाने दिनांक १२ जुलै, २०११ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयाप्रमाणे शासकीय गायरान जमिनीवरील अतिक्रमणे तथा अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याची कार्यवाही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांना विशेष कृतीकार्यक्रम तयार करुन करावी असे विहीत करण्यात आले आहे. त्यानुषंगाने नाशिक विभागात दिनांक १२ जुलै, २०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे नाशिक जिल्ह्यात १३७८ अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली आहेत. धुळे जिल्ह्यात ५७ अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली आहेत. अहमदनगर, जळगांव व नंदूरबार जिल्ह्यात देखील कार्यवाही सुरु आहे. दि.१२ जुलै, २०११ च्या शासन निर्णयात दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत विभागीय आयुक्त, नाशिक यांचे स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या मासिक आढावा बैठकीमध्ये आढावा घेण्यात येत आहे. नाशिक विभागातील सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था याकामी शासन निर्णयानुसार उचित कार्यवाही करण्याचा सूचना देण्यात आल्या असून न्यायालयीन आदेशांचे पालन करण्यात येत आहे.

---

### मसोड (ता.कळमनुरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत

**(२१) १००२७ (०३-०८-२०१५). श्री.रामराव वडकुते, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मसोड (ता.कळमनुरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला मुख्य कार्यकारी अधिकारी व

जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास अचानक भेट दिली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त भेटीच्यावेळी कोणकोणते अधिकारी व कर्मचारी गैरहजर होते व आरोग्य केंद्रात कोणकोणत्या प्रकारच्या त्रुटी निदर्शनास आल्या होत्या याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, गैरहजर असलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०२-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) भेटीच्या वेळी एक कनिष्ठ सहायक व एक परिचर रजेवर होते. आरोग्य केंद्रामध्ये स्वच्छता गृह, आंतरबाहय ठिकाणी अस्वच्छता, मुदतबाहय औषधे आढळून आली. पर्यवेक्षण व संनियत्रणामध्ये त्रुटी आढळल्या.

अनुपस्थितीबाबत एका कनिष्ठ सहायकाचे, अस्वच्छतेबाबत तीन परिचरांचे, पर्यवेक्षणाबाबत एक वैद्यकीय अधिकाऱ्याचे एप्रिल, २०१५ या एक महिन्याचे वेतन व पर्यवेक्षणाच्या अभावासाठी तालुका आरोग्य अधिकाऱ्याचे आठ दिवसाचे वेतन कपात करण्यात आले, मुदतबाहय औषधाच्या रक्कमेची वसुली औषध निर्माण अधिकारी यांचेकडून करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## राज्य शासकीय कर्मचा-यांना हक्काचे घर देण्याबाबत

**(२२) १००३४ (०६-०८-२०१५). श्री.विजय सावंत :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासकीय कर्मचा-यांचा घराचा प्रश्न अत्यंत बिकट झाला असून अनेक राज्य शासकीय कर्मचारी झोपडपट्टयांमध्ये राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने राज्य शासकीय कर्मचा-यांना मालकीची घरे उभारुन हक्काचे घर देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता (०४-०३-२०१६) :** (१) असे कुठलेही सर्वेक्षण गृहनिर्माण विभागास प्राप्त झालेले नाही.
(२) राज्य शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांना म्हाडामार्फत राबविण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनामध्ये ५% आरक्षण ठेवण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माटुंगा (मुंबई) येथे कारच्या डिक्की मधून पैशांची झालेली चोरी**

**(२३) १००४८ (०६-०८-२०१५). श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माटुंगा (मुंबई) येथे कारच्या डिक्कीत ठेवलेली २७ लाख, ५० हजार रुपयांची रक्कम चोरीस गेल्याची घटना दिनांक २५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी माटुंगा पोलीस स्थानकात तक्रार करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार चोरीस गेलेली रक्कम हस्तगत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१६) :** (१) व (२) होय, सदरची घटना दि.१५.०४.२०१५ रोजी वेळ ००:४५ ते २०:१० दरम्यान घडलेली असून त्या अनुषंगाने माटुंगा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१५०/१५, कलम ३७९, ४२७ भा.दं.वि.अन्वये गुन्हा नोंद आहे.

(३) व (४) सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वीज कंपनीने वसुलीबाबत राबविलेले नियमबाहय प्रक्रियेबाबत**

**(२४) १०२०८ (३१-०७-२०१५). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील वीज ग्राहकाकडून थकबाकीची रक्कम वसुली करण्यासाठी मार्गदर्शक तत्वांचे पालन न करता ग्राहकांच्या घरासमोर जाऊन चुकीची वसुली प्रक्रिया राबविल्या बाबतचा आक्षेप सामाजिक कार्यकर्त्यांनी सन २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.ऊर्जामंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे नोंदविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकबाकीत जबाबदार असणाऱ्या वीज कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यासोबतच वसुलीसाठी चुकीची प्रक्रिया राबवून ग्राहकांना अवमानीत करणाऱ्या संबंधीत दोषी अधिकारी व यंत्रणेची चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०२-२०१६) :** (१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) विद्युत ग्राहकांमध्ये विद्युत देयकापोटी असलेली थकबाकी भरण्याकरिता जनजागृती

करण्याच्या उद्देशाने परभणी जिल्ह्यांतर्गत शहरात वीज बिल भरुन सहकार्य करण्याबाबत रॅलीचे आयोजन महावितरण कंपनीच्या परभणी मंडळामार्फत करण्यात आले. या रॅली दरम्यान वीज देयकापोटी थकीत रक्कम वसुली करण्यास्तव महावितरणाच्या मार्गदर्शक तत्वांचे पूर्णपणे पालन करण्यात आले असून कोणासही अवमानित करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली, गोंदिया आणि चंद्रपूर जिल्ह्यात मोबाईल टॉवर उभारण्याबाबत**

**(२५) १०३५६ (०६-०८-२०१५). श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील नक्षलग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोली, गोंदिया आणि चंद्रपूर जिल्ह्यात मोबाईल टॉवर उभारण्यासाठी केंद्र शासनाने माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निधी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार सदर तीन जिल्ह्यात मोबाईल टॉवर उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यात ६० बीएसएनएल मोबाईल टॉवर उभारण्याची मंजुरी मिळाली असून गडचिरोली जिल्ह्यामध्ये ३७ बीएसएनएल मोबाईल टॉवरपैकी ३० टॉवर कार्यान्वित झाले असून ७ टॉवर उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे, गोंदिया जिल्ह्याकरीता १७ बीएसएनएल मोबाईल टॉवरपैकी १५ टॉवर कार्यान्वित झाले असून २ टॉवरचे काम प्रगतीपथावर आहे, चंद्रपूर जिल्हाकरीता ६ बीएसएनएल मोबाईल टॉवरपैकी ४ टॉवर कार्यान्वित झाले असून २ टॉवरचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यात शेती वहिवाट रस्त्यांच्या नोंदी ७/१२ मध्ये घेण्याचे आदेश होण्याबाबत**

**(२६) १०४४८ (३१-०७-२०१५). श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १६५ अ (वाजीवृत्त अर्ज) प्रमाणे शेती वहिवाट रस्त्यांच्या नोंदी ७/१२ मध्ये घेण्याचे आदेश होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक १२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६) :** (१) या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक १३/५/२०१५ रोजीचे निवेदन अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे.
(२) व (३) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १६५ अन्वये खाजगी व्यक्तीच्या शेतातील वहिवाटीच्या जाण्या-येण्याच्या हक्काची नोंद वाजिब-उल-अर्ज या अभिलेखाच्या स्वरुपात घेणे अपेक्षित आहे. त्यानुसार कार्यवाहीचे निर्देश जिल्हाधिकारी, अमरावती यांनी सर्व तहसिलदारांना दिलेले आहेत.

---

**सूर्या (जि.पालघर) धरणातील पाण्याचा सिंचनासाठी वापर करण्याबाबत**

**(२७) १०७९८ (१३-०८-२०१५). श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सूर्या (जि.पालघर) धरणातील १०० टक्के पाणी आदिवासी भागात सिंचनाकरिता वापरण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे जून, २०१५ मध्ये वा दरम्यान राज्यातील खरीप हंगामाच्या आढावा बैठकीत पालघरच्या जिल्हाधिका-यांना आदेश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत शासनाने आदिवासी भागात सिंचनाबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१६) :** (१) नाही.
जिल्हाधिकारी कार्यालयास असे कोणतेही आदेश प्राप्त झाले नाहीत.
(२) सिंचनाबाबत जागृती निर्माण करुन प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र वाढविणेसाठी शेती हंगामापूर्वी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन जागरुकता केली जाते. तसेच शेतकऱ्यांच्या सिंचन व्यवस्थापनामध्ये प्रत्यक्ष सहभाग घेण्यासाठी पाणी वापर संस्था स्थापन करणे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सहसंचालक, आरोग्य सेवा (आरोग्य) पुणे हे पद उन्नत करुन ते अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा या पदामध्ये कार्यान्वित करण्याबाबत**

**(२८) १०९०७ (०३-०८-२०१५). ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरोग्य सेवा संचालनालय, कार्यालय पुणे येथील सहसंचालक, आरोग्य सेवा (आरोग्य) पुणे हे पद उन्नत करुन ते अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा या पदामध्ये कार्यान्वित करण्याची मागणी मा.अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री यांचेकडे सार्वजनिक आरोग्य विभाग सबऑर्डिनेट असोसिएशन, पुणे यांच्यामार्फत दिनांक २ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०२-२०१६) :** (१) होय.
(२) सदर प्रस्तावाबाबत आरोग्य सेवा संचालनालयाचा सुधारीत आकृतीबंध निश्चित करते वेळी विचार करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत जागतिक बँकेच्या सहाय्याने करण्यात आलेल्या करारनाम्यातील अपूर्ण कामांना निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(२९) ११०११ (२२-१२-२०१५). श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत जागतिक बँकेच्या सहाय्याने करण्यात आलेल्या करारनाम्यातील कामे जागतिक बँकेने दिलेली मुदत संपल्यामुळे अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामांकरीता करण्यात आलेला जागतिक बँकेचा करार संपल्यानंतर अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरीता शासनाने या कामांकरीता ३८७.५० लक्ष रुपयांची तरतूद करुनही प्रत्यक्षात निधीचे वितरण केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधीचे वितरण न झाल्यामुळे सदर करारनाम्यांतर्गत सन २०१३ पासुनच्या कामांना निधी वाटप नसल्याने कामे अपूर्णावस्थेत असुन त्याचा सिंचनावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कंत्राटदारांकडून अपुर्ण राहिलेली कामे अंतिम करण्याच्या वारंवार सूचना दिल्या जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर कामे पूर्ण करण्यासाठी व कंत्राटदारांना केलेल्या सन २०१३ पासुनच्या कामांच्या निधीचे वाटप करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०१-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.

महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत जागतिक बँकेचा करार संपल्यानंतर अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरीता शासनाने वित्तीय वर्ष २०१४-१५ मध्ये एकूण रु.१७१३.१० लक्ष इतकी तरतूद केलेली होती. त्यापैकी रु.४२२.९७ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला होता.
(३) नाही.

सन २०१४-१५ पर्यंत निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) अंशत: खरे आहे.

संबंधित मंडळास कामाची गती वाढवून अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करून दिनांक ३१.३.२०१५ अखेर कंत्राटदारास देयके अदा करावे अशा सुचना २४.२.२०१५ चे पत्रान्वये देण्यात आल्या होत्या.

(५) मार्च, २०१५ पर्यंत निधी वितरीत करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यभर कार्यरत असलेली कामगार रुग्णालयातील सोयीसुविधाबाबत**

***(३०) ११०२२ (२२-१२-२०१५). श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :*** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभर कार्यरत असलेली कामगार रुग्णालये किती आहेत,

(२) असल्यास, राज्यातील लाखो कामगारांकरिता राज्य कामगार विमा योजना कार्य करते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ह्या रुग्णालयांकरिता संगणकीकरणाची योजना शासनाने राबविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालयांमध्ये सोयीसुविधा निर्माण करण्याबाबत व रुग्णालये हस्तांतरित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच रुग्णालयाकरिता संगणकीकरणावर किती खर्च झालेला आहे,

(६) तसेच संगणकीकरणाचे काम कोणत्या एजन्सीद्‌वारे करण्यात आलेले आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२५-०२-२०१६) :** (१) राज्यात राकावि योजने अतंर्गत एकूण १४ रुग्णालये कार्यरत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर योजना रा.का.वि.महामंडळ श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे.

(४) राकावि महामंडळ, श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी राकावियो रुग्णालयांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या वैद्‌यकीय सेवेमध्ये सर्वसमावेशक सुधारणा करण्यासाठी राज्य कार्यकारी समिती स्थापित करण्यात आली असून सदर समिती दर तिमाहीस बैठक घेते त्यानुसार राकावियो रुग्णालयातील सोई सुविधांबाबत निर्णय घेऊन डॉक्टर्स व समवैद्‌यकीय कर्मचाऱ्यांची भरती बाबत कार्यवाही करण्यात येत असून रुग्णालय विकास समितीमार्फत नविन वैद्‌यकीय यंत्र व सामुग्री खरेदी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

राकावि महामंडळ श्रम मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी सन २००६ मध्ये "जी राज्ये ही योजना हस्तांतरीत करण्यास इच्छुक असतील अशा सर्व राज्यातील राज्य कामगार विमा योजना राज्य कामगार विमा महामंडळाकडे हस्तांतरीत करण्यात यावी" असा निर्णय घेतला होता. त्यानुषंगाने राज्य मंत्री मंडळाने सन २०१० मध्ये राकावि योजना राकावि

महामंडळास हस्तांरित करण्यास निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने हस्तांतरणाची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. तथापि, सद्य:स्थितीत हस्तांतरणाची कार्यवाही राकावि महामंडळाकडे प्रलंबित आहे.

(५) रा.का.वि.महामंडळ, नवी दिल्ली यांची देखरेख असल्याने ही बाब त्यांचेशी संबंधित आहे.

(६) संगणकीकरणाचे काम M/S Wipro Ltd यांच्या मार्फत करण्यात आले आहे.

---

**सोमवारीपेठ नागपूर येथे राज्य कामगार रुग्णालयात सर्व आजारावर उपचार होत नसल्याबाबत**

**(३१) ११०२३ (२२-१२-२०१५). श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोमवारी पेठ, नागपूर येथील राज्य कामगार रुग्णालयात सर्व आजारावर उपचार होतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रुग्णालयात गत वर्षात किती रुग्ण विविध उपचाराकरिता भरती झाले आहेत,

(३) असल्यास, किती रुग्णांच्या विविध शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, वरील रुग्णालयातील Xray मशिन किती दिवसापासून बंद आहे,

(५) असल्यास, उपरोक्त रुग्णालयात रक्त तपासणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, वरील रुग्णालयात सर्व सोईसुविधा पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२५-०२-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राकावियो रुग्णालय, नागपूर मार्फत विशेषज्ञ बाह्य व आंतररुग्ण उपचार पुरविण्यात येत असुन अतिविशिष्ट वैद्यकिय उपचार हे राकावि महामंडळामार्फत टाय अप करण्यात आलेल्या १९ खाजगी रुग्णालयामार्फत पुरविण्यात येतात.

(२) जानेवारी ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत सदर रुग्णालयात एकूण २२७२१ विमा रुग्ण उपचाराकरिता भरती झाले आहेत.

(३) जानेवारी ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत सदर रुग्णालयात एकूण १२३९ शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

(४) सदर रुग्णालयातील x-ray मशिन जुनी झाल्यामुळे बंद पडत असुन त्याकरिता वेळोवेळी सदर मशीन ची दुरुस्ती करण्यात येते. तथापि, रुग्णसेवेत अडथळा होऊ नये याकरिता सदर रुग्णालयासाठी नविन x-ray मशिन खरेदी करण्यात आली आहे.

(५) हे अशंत: खरे आहे.

सदर रुग्णालयातील प्रयोगशाळा तंत्रज्ञांची सर्व पदे रिक्त झाल्यामुळे सन २०११ पासुन प्रयोगशाळा बंद ठेवण्यात आली होती. तथापि, बंधपत्रित विशेषज्ञ वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येऊन ऑक्टोबर, २०१५ पासुन सदर रुग्णालयातील प्रयोगशाळा सुरु

करण्यात आली असून ऑक्टोबर ते डिसेंबर २०१५ या कालावधीत एकूण ४२९४ चाचण्या करण्यात आल्या आहेत.

(६) सदर रुग्णालयात सोई सुविधा पुरविण्याकरिता राज्य कार्यकारी समितीने घेतलेल्या निर्णयानुसार डॉक्टर्स व समवैद्यकीय कर्मचारी यांची नियुक्ती करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत असून "रुग्णालय विकास समिती" मार्फत वैद्यकीय उपकरणे व यंत्र सामुग्री खरेदीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**राज्यात जननी सुरक्षा योजना राबविण्याबाबत**

**(३२) ११०४४ (२२-१२-२०१५). श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जननी सुरक्षा योजना शासनाने घोषित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना प्रभावीपणे रुग्णालयात राबविली जाते काय,

(३) असल्यास, रुग्णांना औषधे विकत घेण्याकरिता सांगितले जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेअंतर्गत किती गर्भवती मातांना रुग्णालयात उपचारा करिता जाणे येणे करिता वाहतूक खर्च आतापर्यंत करण्यात आला व किती रक्कम दिली गेली ?

**डॉ. दीपक सावंत (२४-०२-२०१६) :** (१) होय,

राज्य शासनाने दि.२२.१२.२००६ च्या शासन परिपत्रकान्वये राज्यात जननी सुरक्षा योजना सुरु केली.

(२) होय.

(३) नाही

जननी सुरक्षा योजनेत औषध पुरवठा करण्याची तरतूद नाही. तथापि, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत योजनेच्या लाभार्थ्यांना औषध पुरवठा करण्याची तरतूद आहे.

(४) जननी सुरक्षा योजनेंतर्गत गर्भवती मातांना रुग्णालयात उपचाराकरीता ये-जा करीता वाहतूक खर्चाची तरतूद नाही. तथापि जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत गरोदर माता, ४२ दिवसांच्या स्तनदा माताना त्यांच्या बालकांसह रुग्णालयात ये-जा करण्याकरिता मोफत वाहन उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे.

---

**राज्यात महात्मा गांधी तंटामुक्त गाव पुरस्काराची रक्कम ग्रामपंचायतीला न देता थेट तंटामुक्ती गाव समितीला देण्याबाबत**

**(३३) ११३४९ (२३-१२-२०१५). श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सन २००७ पासून सुरु केलेल्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेतंर्गत

तंटामुक्त गावांना देण्यात येणाऱ्या पुरस्कार रक्कमेच्या विनियोगात गैरप्रकार होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा गांधी तंटामुक्त गाव पुरस्कार रकमेच्या विनियोगात ग्रामपंचायतीने शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन न करताच मनमानी खर्च केला असल्याची तसेच काही ग्रामपंचायती पुरस्काराची रक्कम सामान्य फंडात अद्यापही अखर्चित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुरस्काराची रक्कम ग्रामपंचायतीला न देता थेट तंटामुक्ती गाव समितीला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## नागपूर शहरातील भिकाऱ्यांवर निर्बंध आणण्याबाबत

**(३४) ११६२० (२३-१२-२०१५). श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात सध्या धार्मिक स्थळी, उपहारगृहे, रेल्वे स्थानके, फूटपाथ इत्यादी ठिकाणी भिकाऱ्यांचा मुक्त संचार सुरु असून भिकाऱ्यांचे प्रमाण वाढत असल्याचे दिनांक ३ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिक मागण्याच्या व्यवसायातही ठेकेदारी पध्दत अंमलात असून ठेकेदारांच्या सांगण्यावरुनच अनेकजण भिक मागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती भिकाऱ्यांवर निर्बंध आणण्यासाठी शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१६) :** (१) नागपूर शहर अंतर्गत धार्मिक स्थळी, उपहारगृहे, रेल्वे स्थानके, फूटपाथ इत्यादी ठिकाणी भिकाऱ्यांचा मुक्त संचार नाही. तथापि, या ठिकाणी भिकारी आढळून आल्यास वेळीच कारवाई करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत भिकाऱ्यांवर निर्बंध आणण्यासाठी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा, नागपूर शहर येथील पथकांकडून शहरातील धार्मिकस्थळी, उपहारगृहे, रेल्वे स्थानके, फुटपाथ इत्यादी ठिकाणी भिक मागणाऱ्यांवर भिक्षा प्रतिबंधक कायदा, कलम ४ व ५ अन्वये कारवाई करण्यात येते. जानेवारी, २०१५ ते सप्टेंबर, २०१५ या कालावधीमध्ये एकूण ३५१ भिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामपंचायतीना लेखा संहिता लागू करुनही अंमलबजाणी न झाल्याबाबत**

**(३५) ११६६४ (२२-१२-२०१५). श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या ग्रामविकास विभागाने आर्थिकदृष्ट्या सक्षम ग्रामपंचायतीच्या कारभाराला शिस्त लावण्यासाठी सन २०११ मध्ये राज्यातील २७ हजाराहून अधिक ग्रामपंचायतींना लेखा संहिता लागू केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लेखा संहितांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदांवर सोपवण्यात आलेली असून ४ वर्षे उलटूनही अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संहितेची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०२-२०१६) :** (१) महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता, २०११ ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या क्र.ग्रापंस-२००२/प्र.क्र.१३५/वित्त-४, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१३ च्या अधिसूचनेअन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) अशी बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी येथील लोकप्रतिनिधी सोबत बैठक न घेणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत**

**(३६) ११७९२ (२३-१२-२०१५). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण १००८/७८६८/प्र.क्र.६१६/विशा-१ (अ) दिनांक १४ ऑक्टोबर, २००८ उपसचिव (विशेष) गृह विभाग, मुंबई प्रमाणे कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी तसेच समन्वय रहावा यासाठी पोलीस अधिक्षकांनी लोकप्रतीनिधींसोबत दर तीन महिन्याला बैठक घ्यावी असे आदेश उपसचिव (विशेष), गृह विभाग यांनी पोलीस अधिक्षकांना काढलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या परिपत्रकाचा अनादर करुन लोकप्रतिनिधींशी बैठक टाळणाऱ्या पोलीस

अधिक्षक अनंत रोकडे, नियती ठक्कर यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी परभणी यांनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पोलीस महासंचालक व उपसचिव (विशेष), गृह विभाग, मुंबई यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, शासन आदेशांचे पालन न करता मनमानी कारभार करणाऱ्या वरील दोन्ही पोलीस अधिकाऱ्यांची चौकशी पुर्ण करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, सदरील चौकशी सुरु न करण्याबाबत होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(५) तसेच, दोषींना पाठीशी घालण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा वेळ काढून धोरण राबवित आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

(३) सन २०१४ मध्ये लोकसभा, विधानसभा निवडणुका, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका, पोलीस भरती, सैन्य भरती, सण, उत्सव कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त व इतर कामात व्यस्त असल्याने तत्कालीन पोलीस अधिक्षक यांना जिल्ह्यातील सदर बैठका घेता आलेल्या नाहीत. तत्कालीन पोलीस अधिक्षक हे परभणी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी यांचे फोनवर व भेटी घेऊन सतत संपर्कात राहत असत तसेच विधानसभा निवडणुका झाल्यावर जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी यांची त्यांनी अनौपचारीक बैठक बोलावली होती. त्यामध्ये सर्व लोकप्रतिनिधीकडून जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था सुधारण्याकरीता त्यांच्या सोबत चर्चा करण्यात आली होती. तसेच जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधीशी ते सतत संपर्कात राहत असत. व त्यांच्याशी वेळोवेळी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्ना विषयी चर्चा करीत असत. यात मुद्दाम टाळाटाळीचे धोरण अवलंबिले नाही. तसेच परभणी पोलीस दलातर्फे दि.१९.०८.२०१५ व दि.२८.१२.२०१५ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीस जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना निमंत्रण देण्यात आले होते. सदर बैठकीस एकही लोकप्रतिनिधी हजर राहिले नाहीत. तसेच सन २०१६ चा लोकप्रतिनिधींच्या बैठकीचा कार्यक्रम निश्चित केला आहे. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्य शासनाच्या विविध विभागात मागासवर्गीयांच्या पदांचा अनुशेष भरण्याबाबत

**(३७) १२६०३ (२३-१२-२०१५). श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध विभागात मागासवर्गीयांच्या सुमारे २९६६१ पदांचा अनुशेष असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) दरवर्षी सरळसेवा व पदोन्नतीने पदे भरण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने अनुशेष

वाढतच आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाच्या गट-अ मधील किती पदांचा अनुशेष आहे व त्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, वि.जा.भ.जा. विशेष मागास प्रवर्ग इत्यादी पदांचा किती अनुशेष आहे,
(४) तसेच गट ब, क व ड मध्ये सरळसेवा व पदोन्नतीने भरण्यासाठी पात्र उमेदवार उपलब्ध असतानाही पदे न भरल्यामुळे सध्या अनुशेष किती आहे,
(५) मागासवर्गीयांचा अनुशेष पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०१६) :** (१), (२), (३) व (४) दि. ३१.३.२०१४ अखेर गट-अ ते गट-ड मधील सुमारे २९६११ इतका मागासवर्गीयांचा अनुशेष आहे. यापैकी गट-अ मध्ये अ.जाती-८६५, अ.जमाती-८८०, वि.जा.भ.ज.-८२६ व वि.मा.प्र.२५१ असा अनुशेष आहे.

एकूण अनुशेषापैकी गट-ब-३४२१, गट-क-१५६३१ व गट-ड-६९४३ इतका सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष आहे.

मागासवर्गीयांचा शासकीय सेवेतील अनुशेष भरण्याच्या विशेष मोहिमेस शासन निर्णय दिनांक २१ ऑगस्ट, २०१३ अन्वये दिनांक ३१ मार्च, २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.
(५) शा.नि.दि. ३ जून, २०१४ अन्वये गट-अ ते गट-ड संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्यासाठी विहित केलेली प्रतिवर्षी मंजूर पदांच्या कमाल ३ टक्केची मर्यादा रद्द करण्यात आली आहे.

अनुशेषाची पदे भरण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.

---

### राज्यात आदिवासी बहुल जिल्ह्यात, अनुसूचित क्षेत्राबाहेर अनुसूचित जमातीसाठी ७ टक्के आरक्षण लागू करण्याबाबत

**(३८) १२६८५ (२३-१२-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा. राज्यपाल यांचे अधिसुचनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील सुनिश्चित केलेली १२ संवर्गातील पदे स्थानिक अनुसूचित जमातीतील उमेदवारांमधून भरण्याच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१३ए/१४/१६-ब, दिनांक ५ मार्च, २०१५ अन्वये आदिवासी बहुल जिल्ह्यात अनुसूचित क्षेत्राबाहेर अनुसूचित जमातीसाठी ७ टक्के आरक्षण लागू करणे संदर्भातील विहित मार्गदर्शक तत्वे जाहिर करण्यत आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शासन निर्णयात नमुद १२ संवर्गातील पदे अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरणे आणि अनुसूचित क्षेत्राबाहेर अनुसूचित जमातीसाठी ७ टक्के आरक्षण या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव व अहमदनगरसह अन्य ८ अशा एकूण १३ जिल्ह्यांमध्ये अनुसूचित क्षेत्राचा समावेश होतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुसूचित क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या तालुक्यांची/गावाची खात्री सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी आदिवासी विकास विभागाकडून करावी, तसेच आदिवासी विकास विभागाने सदर गावांची सद्य:स्थिती दर्शविणारी तालुकानिहाय यादी सर्व विभागांना उपलब्ध करुन द्यावी, असेही निर्देश शासनाकडून या शासन निर्णयाद्वारे देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रस्तुत शासन निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप झालेली नाही, व संबंधित विभागाकडून शासनाकडे याबाबत अधिक मार्गदर्शनाची विचारणा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, अनुसूचित क्षेत्रात व अनुसूचित क्षेत्राबाहेर समाविष्ट गावे, अनुसूचित जमातीसाठीच्या आरक्षणाच्या प्रमाणाबाबत तसेच प्रस्तुत शासन निर्णयाचे अंमलबजावणीबाबत संभ्रम असल्याने याबाबत शासनाकडून कोणते मार्गदर्शन करण्यात आले वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०१-२०१६) :** (१), (२), (३) व (४) होय.

(५) व (६) शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१३ए/१४/१६-ब, दिनांक २६ जून, २०१५ अन्वये मार्गदर्शन करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करतांना, विभागांना येणाऱ्या अडचणीबाबत आदिवासी विकास विभागाशी सल्लामसलत करुन वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येते.

---

## विक्रीकराची वसूली करण्याबाबत

**(३९) १२९७८ (१२-१२-२०१५). श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००९-१० मध्ये ३१ प्रकरणात विक्रीकराची ३५० कोटी रुपयांची वसूली झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त विक्रीकराची वसूली झालेली नसल्यामुळे कॅगने आपल्या अहवालात प्रतिकूल शेरे दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ३५० कोटी रुपयांची विक्रीकराची वसूली न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०२-२०१६) :** (१) होय.

(२) उपरोक्त प्रकरणातील कार्यवाहीबाबत कॅगने विचारणा केलेली आहे.

(३) वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

(४) उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार सादर करण्यात येते की, महालेखापाल (कॅग) यांनी काही

वसुली प्रकरणांची पडताळणी करून त्याचा समावेश महालेखापाल (कॅग) यांच्या वर्ष २००९-१० चा अहवाल क्र.८ च्या अहवालात केलेला असून सदर प्रकरणांचा अनुपालन अहवाल महालेखापाल यांना देण्यात आलेला आहे. सदर अहवाल लोकलेखा समितीपुढे सादर होणे नजीकच्या काळात अपेक्षित आहे.

(५) लागू नाही.

---

**राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना चौदाव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४०) १२९८९ (२२-१२-२०१५). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना चौदाव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात जनरल बेसिक ग्रँटच्या पहिल्या हप्त्यापोटी देण्यात येणारा ८११ कोटी ६६ लाख रुपयांचा निधी केंद्र शासनाने राज्य शासनास दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे वितरण केव्हा, कशाप्रकारे व कोणत्या निकषांनुसार करण्यात आलेले आहे,

(३) असल्यास, उक्त खर्चाची कार्यपध्दती निश्चित करण्यात येईपर्यंत उक्त निधी खर्च करु नये अशा सूचना राज्य शासनाने जिल्हा परिषदांना दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निधी खर्चाच्या सूचना जिल्हा परिषदांना देण्यात आल्या आहेत काय, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०२-२०१६) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) ग्रामविकास विभागाच्या क्र.चौविआ२०१५/प्र.क्र.२६/वित्त-४, दिनांक १६ जुलै, २०१५ या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या निकषानुसार केंद्र शासनाकडून प्राप्त चौदाव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाच्या जनरल बेसिक ग्रँटच्या निधीचे वितरण दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी सर्व जिल्हा परिषदांना (ग्रामपंचायत स्तरासाठी) अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे (बीम्सद्वारे) करण्यात आले आहे.

(३) सदर निधीच्या विनियोगासंबंधी कार्यपध्दती विशद करणारा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत असल्याने असा शासन निर्णय निर्गमित होईपर्यंत सदर अनुदानातून कोणताही खर्च करण्यात येऊ नये, अशा सूचना दिनांक १६ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या होत्या.

(४) चौदाव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीचा विनियोग ग्रामपंचायतींनी, त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या मुलभूत सुविधा नियमितपणे व प्रभावीपणे देण्यासाठी करावयाचा आहे. त्याअनुषंगाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन चौदाव्या वित्त आयोगाच्या पहिल्या आर्थिक वर्षाच्या वितरीत निधीतून ग्रामपंचायतींनी घ्यावयाची विकास कामे, त्याचे

नियोजन व कामे घेण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती या संदर्भातील मार्गदर्शक सूचना दिनांक २१ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. त्यानुसार निधी खर्च करण्यास अनुमती देण्यात आली आहे.

---

**सातारा जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयात कर्करोग रुग्णांसाठी बाह्यरुग्ण विभाग सुरु करण्याबाबत**

**(४१) १३२०४ (२२-१२-२०१५). श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा रुग्णालय व कृष्णा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स, कराड यांच्यातर्फे येथील जिल्हा रुग्णालयात महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरुवारी कर्करोग रुग्णांसाठी बाह्यरुग्ण विभाग सुरु करण्यात येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा कर्करोग बाह्यरुग्ण विभाग सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२४-०२-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सातारा जिल्ह्यातील क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा रुग्णालय, सातारा येथे कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स, कराड, जिल्हा सातारा यांचे मार्फत कर्करोग रुग्णांसाठी बाह्य रुग्ण विभाग दिनांक ३.९.२०१५ पासुन सुरु करण्यात आलेला आहे. येथे कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स, कराड येथील तज्ञ डॉक्टरांमार्फत दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरुवारी बाह्य कर्करोग रुग्णांची तपासणी करण्यात येत असून दिनांक ३.९.२०१५ ते दि.१५.११.२०१५ या कलावधीत ४४ रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जिल्हाधिकारी औरंगाबाद कार्यालयांतर्गत रिक्त पदासाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षा रद्द करण्याच्या मागणीबाबत**

**(४२) १३३३६ (२१-१२-२०१५). श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हाधिकारी औरंगाबाद कार्यालयांतर्गत रिक्त पदांसाठी रविवार, दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतलेल्या लेखी परिक्षामध्ये प्रश्न पत्रिका १०० मार्कांची तर उत्तर पत्रिका ८० मार्कांची असल्याने सदर परिक्षाच रद्द करणेसाठी मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुक्रमे मराठी, इंग्रजी, बौध्दीक क्षमता व सामान्यज्ञान असे समान २५ मार्क प्रमाणेची परिक्षा होती तर ८० मार्काचीच उत्तर पत्रिका असल्याने सामान्य ज्ञानाची उत्तर लिहिण्याचा मार्गच बंद झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व सदर परिक्षा रद्द करुन परत परिक्षा घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६) :** (१), (२) व (३) औरंगाबाद जिल्हा महसूल आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील १० रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक १४ जून, २०१५ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन पात्र उमेदवाराची दिनांक १३.९.२०१५ रोजी लेखी परिक्षा आयोजित करण्यात आली होती. तथापि, या कामी नियुक्त करण्यात आलेल्या अभिकर्ता संस्थेने सदर परीक्षेसाठी १०० गुणांच्या प्रश्नपत्रिकेसाठी ८० गुणांची सदोष उत्तरपत्रिका पुरविल्यामुळे, तांत्रिक कारणास्तव जिल्हा निवड समितीने सदरची परीक्षा रद्द करण्यात आलेला आहे व रद्द केली. सदर रद्द केलेली लेखी परीक्षा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेकडे सोपवून, दिनांक ११.१०.२०१५ रोजी सुरळीत व सुनियोजित पध्दतीने फेर लेखी परीक्षा घेण्यात आली आहे. तसेच संबंधित अभिकर्ता संस्थेचा करारनामा रद्द करण्यात आलेल्या परिक्षेचा खर्च संबंधित अभिकर्ता संस्थेकडून वसूल करण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

### दापोली (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामपंचायतींना इंटरनेट सुविधा देण्याबाबत

**(४३) १३६९४ (२२-१२-२०१५). श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रायगड) तालुक्यातील १०६ ग्रामपंचायतीपैंकी अवघ्या ४७ ग्रामपंचायतीकडे इंटरनेट सुविधा आहे व बाकी ५९ ग्रामपंचायती अद्याप ऑनलाईन सुविधेपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०२-२०१६) :** (१) दापोली तालुक्यातील १०६ पैकी ४८ ग्रामपंचायती मध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. उर्वरित ५८ ग्रामपंचायतीमध्ये आवश्यक क्षमतेची इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही.
(२) व (३) होय,

इंटरनेट सुविधा नसलेल्या ग्रामपंचायतीचे ऑनलाईन काम लगतच्या इंटरनेट सुविधा असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये अथवा पंचायत समितीमध्ये करण्यात येते.

जिल्हा परिषद रत्नागिरीकडून भारत संचार निगम लिमिटेड (बी.एस.एन.एल) कडे

इंटरनेट नसलेल्या ग्रामपंचायतीना इंटरनेट व दुरध्वनी सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच नॅशनल ऑप्टीकल फायबर नेटवर्क (NOFN) अंतर्गत राज्यातील सर्वच ग्रामपंचायतीना ऑप्टीकल फायबर नेटवर्कद्वारे उच्च क्षमतेची इंटरनेट सेवा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे. त्यात दापोली तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीनाही सुविधा उपलब्ध होणार आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**नागपूर येथील देशी व विदेशी दारुचे दुकाने अनियमित वेळेपर्यत सुरू असल्याबाबत**

**(४४) १३९३१ (२१-१२-२०१५). श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात देशी व विदेशी दारुचे दुकाने किती आहेत,

(२) असल्यास, सदर दुकानांकरिता सुरु करण्याची व बंद करण्याची वेळ मर्यादा आहे काय,

(३) असल्यास, नागपूर येथे किती बियर शॉप परवानगी ने सुरु आहेत,

(४) असल्यास, राज्य उत्पादन शुल्क विभाग, नागपूर येथे अधीक्षकपद रिक्त आहे, हे खरे काय,

(५) असल्यास, सदर दुकाने सकाळी ६ वाजता सुरु होत असून त्याबाबत नागरीकांनी तक्रार केली असतानाही त्यावर कारवाई केली जात नाही, हे खरे आहे काय,

(६) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-०२-२०१६) :**(१) नागपूर शहरात सन २०१५-२०१६ या वर्षात कार्यरत देशी व विदेशी दारुची दुकाने खालीलप्रमाणे आहे.

१) सीएल-२ अनुज्ञप्ती-१६
२) सीएल-३ अनुज्ञप्ती-१२१
३) एफएल-१ अनुज्ञप्ती-१७
४) एफएल-२ अनुज्ञप्ती-९४
५) एफएल/बीआर-२ अनुज्ञप्ती-७७
६) एफएल-३ अनुज्ञप्ती-३२८

(२) होय.

(३) नागपूर शहरात सन २०१५-२०१६ मध्ये बीअर शॉपी ची ७७ अनुज्ञप्त्या कार्यरत आहेत.

(४) हे खरे नाही.

दि.०५/१०/२०१५ पासून सदर पद नियमित स्वरुपात भरण्यात आले असून यापूर्वी सदर पद अतिरिक्त कार्यभाराने कार्यरत होते.

(५) व (६) अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यावर विशेष मोहिम राबवून अनुज्ञप्तीधारकांविरुध्द गुन्हे नोंदविण्यात आली आहेत तसेच महाराष्ट्र दारुबंदी कायद्यातील नियम ५४(१) (क) नुसार कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात धर्मादाय विभागातील रिक्त पदे भरणेबाबत**

**(४५) १४४०० (२३-१२-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** दिनांक ९ एप्रिल, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक पाच मधील प्रश्न क्रमांक ५२८० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक, शैक्षणिक संस्थांसह देवस्थानच्या विश्वस्तांच्या अर्ज बदलासह (चेंज रिपोर्ट) घटना दुरुस्ती, मिळकती संदर्भातील सुमारे ७९,८१५ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आठही विभागीय धर्मदाय सहआयुक्त कार्यालयातील एकूण १,४३,१९६ प्रकरणे वर्षानुवर्षे विविध विभागात प्रलंबित असल्याचे देखील माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विविध जिल्ह्यांमधील धर्मादाय उपायुक्त संवर्गातील रिक्त असलेल्या उर्वरित ३ पदांपैकी १ पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून तसेच २ पदे न्यायिक सेवेतील अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने त्याचप्रमाणे सहाय्यक धर्मादाय आयुक्त संवर्गातील उर्वरित रिक्त पदांपैकी २ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून वा न्यायिक सेवेतील अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने भरण्यासंबंधीची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, राज्यात धर्मादाय विभागातील रिक्त असलेली पदे भरण्यात आली आहेत काय,

(५) नसल्यास, प्रलंबित प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी शासनाने रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०१६) :** (१) ऑगस्ट, २०१५ अखेर ७५५४८ बदल अर्ज प्रलंबित होते.

(२) राज्यातील आठही विभागीय धर्मादाय सह आयुक्त व त्यांचे अधिपत्याखालील कार्यालयांकडे ऑगस्ट, २०१५ अखेर १,३२,३८२ प्रकरणे प्रलंबित होती.

(३) धर्मादाय उप आयुक्त संवर्गातील १ पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस केलेल्या उमेदवाराच्या नियुक्तीने व १ पद न्यायिक सेवेतील अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने भरण्यात आले आहे.

सहायक धर्मादाय आयुक्त संवर्गातील २ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस झालेल्या उमेदवारांच्या नियुक्तीने भरण्यात आली आहेत.

(४) व (५) धर्मादाय आयुक्त यांच्या आस्थापनेवरील मंजूर पदांपैकी रिक्त असलेली पदे भरण्यात आली नसली तरी त्याबाबत प्रक्रिया चालू आहे.

धर्मादाय आयुक्त यांच्या आस्थापनेवरील गट-क संवर्गातील पदांकरिता सेवा प्रवेश नियमानुसार विहित सेवा प्रवेशोत्तर परीक्षेची कार्यवाही धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून सुरु असून परीक्षेची कार्यवाही झाल्यानंतर पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरण्यात येणार आहेत तसेच काही नवनिर्मित पदांचे सेवा प्रवेश नियम मान्यतेसाठी सादर करण्यात आले असून मान्यता प्राप्त झाल्यानंतर रिक्त पदे भरण्याची आवश्यक कार्यवाही करुन सदर रिक्त पदे भरण्यात येतील.

---

## मुंबईतील आर्युमान संपलेल्या इमारतींवर करावयाची कार्यवाही

**(४६) ४९००४ (०३-०७-२०१४). ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणात ३२ हजार ४२९ इमारतीचे आयुर्मान संपल्याचे माहे मार्च, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आयुर्मान संपलेल्या इमारतींपैकी किती इमारतींवर कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व किती इमारतीवर कार्यवाही करण्याचे बाकी आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणात ३२ हजार ४२९ इमारतींचे आयुर्मान संपल्याचे माहे मार्च, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे नाही.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभाग कार्यालयाने त्यांच्या विभागातील मोडकळीस आलेल्या / धोकादायक (C-१) श्रेणीमधील इमारतींची पाहणी केली असता, ४०५ खाजगी इमारती, १२७ महानगरपालिका इमारती व ५२ शासन (म्हाडा) इमारती अशा एकूण ५८४ इमारती धोकादायक आढळून आल्या आहेत.

(२) मोडकळीस आलेल्या धोकादायक (C-१) श्रेणीमध्ये मोडणाऱ्या एकूण ५८४ इमारतींपैकी ७० इमारती बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आल्या आहेत. तसेच २८९ इमारतीवर निष्कासित करण्यात आल्या आहेत. तसेच २८९ इमारतींवर निष्कासनाची कार्यवाही सुरु असून त्यापैकी ६ इमारतींचे अंशत: निष्कासन सुरु आहे. इमारत रिकामी करण्याची कार्यवाही सुरु केलेल्या इमारतींची संख्या ५२ आहे व दुरुस्ती सुचविलेल्या इमारतींची संख्या ११६ आहे.

उर्वरित खाजगी इमारतींबाबत, इमारतींवर बजावलेल्या नोटीशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महापालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच महापालिका इमारतींबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यात होणा-या अपघातास प्रतिबंध करण्यासाठी ट्रामा केअर युनिट स्थापन करण्याबाबत

**(४७) ४९१११ (२०-०६-२०१४). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यात होणा-या अपघातास प्रतिबंध करणेबाबत शासनाने ट्रामा केअर युनीट स्थापन करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :** (१) दिनांक २७.२.२००८ च्या शासन निर्णयाअन्वये वाशिम जिल्ह्यात २०० खाटांच्या रुग्णालयामध्ये १० विशेषोपचार कक्षामध्ये ट्रामा केअर युनीट स्थापन

करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

(२) वाशिम येथील २०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयात आर्थेपिडीक ऑपरेशन थिएटर उपलब्ध आहे. वाशिम येथील जिल्हा रुग्णालयात स्वतंत्र २० खाटाच्या ट्रामा केअर युनिटच्या बांधकामाबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे वावे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे महिलांसाठी ५० खाटांचे रुग्णालय बांधण्याबाबत**

**(४८) ४९२०० (२०-०६-२०१४). ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वावे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे ५० खाटांचे महिलांसाठी रुग्णालय बांधण्यासाठी मंजुरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे का,

(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१२-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चर्नी रोड (मुंबई) येथे धातू खरेदी-विक्री करणाऱ्या व्यावसायिकाची ऑनलाईन बँकिंगच्या माध्यमातून केलेली फसवणूक**

**(४९) ५१११६ (०३-०७-२०१४). ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चर्नी रोड (मुंबई) येथे धातू खरेदी-विक्री करणारे दिनेश भंडारी या व्यावसायिकांच्या बँक खात्यांवर हॅकर्सनी ऑनलाईन बँकिंगच्या माध्यमातून तब्बल सात लाख रूपयांची रक्कमेची फसवणूक केल्याची घटना माहे मार्च, २०१४ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी गिरगांव येथील व्ही.पी.रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) फिर्यादी यांचे पैसे ट्रान्सफर झालेले इंडसईड बँकेचे खाते हे दिल्ली व जयपूर येथील असल्याची माहिती प्राप्त झाली असून तसेच रक्कम ज्या ए.टी.एम.सेंटर मधुन काढण्यात आली आहे त्याचे सी.सी.टि.व्ही. फुटेज प्राप्त करण्यात आले आहे.

(४) सदर गुन्हयाच्या पुढील तपासाच्या अनुषंगाने पोलीस पथक दिल्ली व जयपूर येथे पाठविण्यात येत असून आरोपींना अटक करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

---

**मुंबईतील डीएनझेड एंटरप्रायझेसला अनुज्ञापन मंजुरी आदेश देण्याबाबत**

**(५०) ५१९२७ (०३-०७-२०१४). श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने व आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी नियमाप्रमाणे दिलेल्या परवानगीनुसार डीएनझेड इंटरप्रायझेसने लाला लजपतराय मार्ग, मुंबई येथील शासनाच्या मालकीच्या जागेवर ३० X२० फूटाचा जाहिरात फलक लावण्याबाबतचा अर्ज महानगरपालिकेच्या धोरणातील तरतूदींना अनुसरुन राज्य शासनाच्या इतर विभागाच्या मिळविलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रांसह देय रक्कम भरुन अनुज्ञापन मिळण्याकरिता दिनांक ५ ऑगस्ट, २०११ रोजी वा त्यासुमारास वरिष्ठ निरिक्षक (अनुज्ञापन) जी/दक्षिण विभागास सादर केलेला आहे, हे खर आहे काय,

(२) सदरहून अर्ज २ महिन्यात निकाली काढण्याचे मार्गदर्शक निदेश असतांनाही डीएनझेड इंटरप्रायझेसने अनुज्ञापन मंजुरीसाठी सादर केलेल्या अर्जास ३ वर्षे उलटूनही अद्यापही अनुज्ञापन कार्यालयामार्फत मंजुरी आदेश काढण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) अनुज्ञापन कार्यालयामार्फत होत असलेल्या दिरंगाईमुळे राज्य शासन व महानगरपालिका यांना मिळणारा कोटयवधी रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) डीएनझेड इंटरप्रायझेसची शासन व बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी मान्यता दिलेली सदरहू नस्ती अनुज्ञापन विभागामार्फत गहाळ झाली असल्याने अनुज्ञापन मंजुरीचे आदेश काढण्यात विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) डीएनझेड इंटरप्रायझेसला अनुज्ञापन मंजुरी आदेश त्वरित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. डीएनझेड इंटरप्रायझेस यांनी केलेला अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणाच्या निकषात नसल्यामुळे नामंजूर करण्यात आला आहे व याबाबत संबंधित जाहिरातदारास दिनांक ०९.०७.२०१४ रोजी कळविण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) हे खरे नाही. डीएनझेड एंटरप्रायझेसचा अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नामंजूर करण्यात आला आहे.

---

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.